# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२२

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना केंद्र शासनाच्या राष्ट्रीय कुटुंब योजनेचा लाभ मिळण्याबाबत

**(१) १३६९९ (०४-०७-२०२२) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना अर्थसहाय्य करणाऱ्या केंद्र शासनाच्या राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेच्या लाभार्थ्यांची राज्यातील संख्या २३ हजारावरून ९ हजारापर्यंत कमी झाल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या सामाजिक सहाय्य कार्यक्रमाचा एक भाग म्हणून दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील कमवणाऱ्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास रुपये २० हजार एवढी मदत संबंधित कुटुंबाला केली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासन ही रक्कम राज्य शासनास वितरित करते व राज्य शासनाच्या माध्यमातून लाभार्थ्यांना रक्कम दिली जाते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेच्या लाभार्थ्यांची निवड राज्य शासनाकडून केली जात असल्यामुळे राज्यातील लाभार्थ्यांची संख्येमध्ये घट होण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लाभार्थ्यांना सदरहू योजनेचा लाभ मिळण्याकरिता शासनाकडून याबाबत योग्य ती खबरदारी घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेचा लाभ १९८३३ लाभार्थ्यांना देण्यात आला आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

# पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील रोहींजन गावात वाटप केलेल्या जमिनीचा अपहार झाल्याबाबत

**(२) १३७४३ (१२-०७-२०२२) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयना प्रकल्पग्रस्तांना शेती लागवडीसाठी पनवेल महानगरपालिका क्षेत्रात येणाऱ्या रोहींजन गावात वाटप केलेली सात एकर जमीन प्रकल्पग्रस्तांनी शेती लागवडीखाली न वापरता बिगर प्रकल्पग्रस्त विकासकाला आणि संबंधित विकासकाने जादा किमतीत अन्य विकासकाला विकल्याचे बाब दिनांक १२ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगर क्षेत्रांतर्गत असलेल्या महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय जमिनी विकासकाने शासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने प्रकल्पग्रस्तांची फसवणूक करुन अपहार केल्याबात जिल्हाधिकारी, रायगड यांनी संबंधितांवर कारवाई केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोयना पुनर्वसनांतर्गत अनेक प्रकल्पग्रस्तांनी मुंबई महानगर क्षेत्रांतर्गत येणाऱ्या पनवेल, ठाणे व मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पर्यायी शेतजमीन मिळावी, याबाबत मदत व पुनर्वसन मंत्री तसेच ठाणे व रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडे केलेल्या मागणीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मदत व पुनर्वसन विभागाने कोयना प्रकल्पग्रस्तांचे ठाणे व रायगड महानगरपालिका क्षेत्रातील शेत जमिनीच्या मागणीचे प्रस्ताव महूसल विभागाकडे तपासणीसाठी पाठविले आहेत काय, तसेच आयुक्तांनी दिलेल्या निदेशानुसार ठाणे व रायगड जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांचे अहवाल शासनास प्राप्त झाले आहेत काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील रोहींजन गावातील शासनाने वाटप केलेल्या जमिनी शासकीय अधिकाऱ्यांशी संगनमत करून अपहार करणाऱ्या दोषी विकासकांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-०८-२०२२) :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे रोहींजन, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथे कोयना प्रकल्पग्रस्तांना वाटप केलेल्या पर्यायी जमीनीसंदर्भात वृत्त महाराष्ट्र टाईम्स या दैनिकात दिनांक १२/०५/२०२२ रोजी प्रसिध्द झाले आहे. सदर बातमीच्या अनुषंगाने क्षेत्रिय कार्यालयाकडून सविस्तर अहवाल मागविण्यात आला असून सदरचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

कोयना प्रकल्पग्रस्तांनी रायगड व ठाणे जिल्ह्यात पर्यायी जमीन मागणीबाबत शासनस्तरावर तसेच क्षेत्रिय स्तरावर निवेदने दाखल केली आहेत. सदर निवेदनांच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेमार्फत काही प्रकरणाबाबत शासनास अहवाल प्राप्त झालेले आहेत. सदर प्रकरणाच्या अनुषंगाने नियमानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सेलू (जि.परभणी) कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गाळे विक्री प्रकरणांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३) १३७५९ (०४-०७-२०२२) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक १२०६५ ला दिनांक १० मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू (जि.परभणी) कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गाळे विक्रीमध्ये विविध नियमांचा भंग केल्याप्रकरणी परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लेखी निवेदन मा.प्रधान सचिव, सहकार विभाग यांना माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गाळे लिलाव / विक्री प्रकरणी झालेला नियमभंग व गैरप्रकारांची मुद्देनिहाय चौकशी करण्याबाबत जिल्हा उपनिबंधक, परभणी यांनी विशेष लेखा परिक्षक यांची नेमणूक केली असून सदर प्रकरणी विशेष लेखा परिक्षक वर्ग-२, सहकारी संस्था (फिरते पथक) परभणी यांचा चौकशी अहवाल अद्यापपर्यंत शासनास अप्राप्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या दोषी अधिकारी व कर्मचारी यांची चौकशी करुन अवैध गाळे विक्री प्रकरणास स्थगिती देवून सदर प्रक्रिया नव्याने राबविण्याचे प्रस्तावित आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विशेष लेखा परिक्षक वर्ग-२, सहकारी संस्था (फिरते पथक) परभणी यांचा चौकशी अहवाल शासनास उपलब्ध होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१७-०८-२०२२) :** (१) हे खरे आहे.

स्थानिक प्रतिनिधी यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांनी विशेष लेखा परिक्षक वर्ग-२, सहकारी संस्था (फिरते पथक) परभणी यांना दिनांक ०३/०१/२०२२ व दिनांक १४/०१/२०२२ अन्वये सविस्तर चौकशी करण्यासाठी प्राधिकृत केले आहे.

(२), (३) व (४) नाही.

विशेष लेखा परिक्षक वर्ग-२, सहकारी संस्था (फिरते पथक) परभणी यांनी गाळे लिलाव / विक्री प्रकरणी झालेला नियमभंग व गैरप्रकारांची मुद्देनिहाय चौकशी अहवाल दिनांक २३/०२/२०२२ रोजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांच्याकडे सादर केला आहे. तथापि, सदर अहवालाच्या अंतिम निष्कर्षात कृषी उत्पन्न बाजार समिती सेलूच्या उपरोल्लेखित विवादित १ ते २४ प्लॉटच्या बाबतीत मा.जिल्हा सत्र न्यायालय, परभणी येथे दावा क्रमांक ५१/२०२१ अन्वये दिलेल्या निकालानुसार दिवाणी न्यायालय,सेलू येथे वर्ग करण्यात आलेला आहे. तसेच मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे विवादित २४ प्लॉटच्या लिलाव प्रक्रिये विरुध्द याचिका क्रमांक १११२/२०२२ दाखल करण्यात आलेले आहे. त्यामुळे दोन्ही प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने उक्त चौकशी अहवाल अंतिम करण्यात आलेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई महापे औद्योगिक क्षेत्रातील नैसर्गिक नाल्यांच्या संवर्धनाबाबत

**(४) १३७६९ (०४-०७-२०२२) श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक १२११४ ला दिनांक १० मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील महापे औद्योगिक विभागात असणाऱ्या नैसर्गिक नाल्यांची अवस्था भयावह असून या नाल्यांमध्ये घाणीचे साम्राज्य तसेच झाडाझुडपांची वाढ झाल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाल्यात रसायनमिश्रीत पाणी सोडल्याने नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून महापे एमआयडीसीतील नैसर्गिक नाल्यांमधील रसायनमिश्रीत पाणी थांबवून नैसर्गिक नाल्यांचे संवर्धन करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून सन २००४ मध्ये टिटिसी औद्योगिक क्षेत्रातील रस्ते व नाले देखभाल व दुरुस्तीकरीता नवी मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आले असून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये सदर जागेवर वृक्ष लागवड, बागबगीचा विकसित करण्याचे प्रस्तावित करुन नैसर्गिक नाल्याच्या रुंदीनुसार वृक्ष लागवडीचा आराखडा तयार करण्याबाबत निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने नाल्याचे संवर्धन करण्याबाबत औद्योगिक विकास महामंडळ व नवीमुंबई महानगरपालिकेशी समन्वय साधून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२२-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.

पावसाळ्यापूर्वी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नाल्यांची साफसफाई नवी मुंबई महापालिकेने केलेली आहे. नाल्यामध्ये वाढलेली झाडेझुडपे काढण्यात आली आहेत.

(२) हे खरे नाही.

तथापि, श्री.नामदेव धर्मा डाऊरकर यांची दिनांक ३०/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये इलेट्रॉनिक झोन समोरील नाल्यामध्ये भराव टाकून बुजविल्याबाबत व औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी तुंबल्याबाबत तक्रार प्राप्त झाली होती. म.औ.वि.महामंडळाच्या टि.टि.सी. औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी वाहिन्यांच्या देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यात येतात. सांडपाणी वाहिनीवर गळती आढळल्यास गळती बंद करणेसाठी त्वरीत कार्यवाही करण्यात येते.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

मऔवि महामंडळाने टि.टि.सी. औद्योगिक क्षेत्रातील रस्ते, नाले व गटारे पुढील विकासाकरीता आणि देखभाल व दुरुस्तीकरीता सन-२००४ रोजीच्या करारनाम्यानुसार नवी मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आले आहेत. महापे जंक्शन येथील इलेक्ट्रॉनिक झोनसमोरील भुखंड क्र.जीटीएल-१ आणि जीटीएल-५ मधील २४०० चौ.मी. मोकळी जागा वृक्ष लागवड व बाग-बगीचा सुशोभिकरणाकरीता मऔवि महामंडळातर्फे दिनांक १६/११/२०२१ रोजीच्या वाटप पत्रान्वये मे.इन्फ्राटेक कॉंक्रीट सोल्युशन यांना नैसर्गिक नाला अबाधित राखून वाटप करण्यात आली होती.

तथापि, भुखंडधारकास वाटप पत्रातील अटींनुसार वृक्ष लागवड व बाग-बगीच्या करीता मऔवि महामंडळाकडून नकाशे मंजुरी घेणेबाबत आणि पावसाच्या पाण्याचा निचरा होणेकरीता १० मी. रुंदीचा नाला मोकळा सोडण्याकरीता कळविले होते. परंतु, वरील दोन्ही बाबींची पूर्तता न केल्यामुळे सदर भूखंडाचे वाटप पत्र रद्द करण्याचा निर्णय झाला आहे. टि.टि.सी. औद्योगिक क्षेत्रातील रस्ते व नाल्यांची देखभाल व दुरुस्तीची कामे नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत केली जातात. त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेस सदर ठिकाणी बांधीव नाला करणेबाबत विनंती करण्यात आली आहे. पावसाळयात नैसर्गिक प्रवाहास अडथळा येऊ नये म्हणून मऔवि महामंडळातर्फे १० मी. रुंदीचा नाला मोकळा करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील इतर मागास वर्ग व विशेष मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या परदेशी शिष्यवृत्तीची संख्या वाढविण्याबाबत

**(५) १३७७६ (०४-०७-२०२२) श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इतर मागास वर्ग कल्याण विभागामार्फत विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासप्रवर्ग व विशेष मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी देण्यात येणारी परदेशी शिष्यवृत्ती १० विद्यार्थ्यांऐवजी ५० विद्यार्थ्यांना देण्यात यावी ही मागणी स्टुडंट्स राइट्स असोसिएशन ऑफ इंडिया ने केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान या संदर्भात बहुजन कल्याण मंत्री, शासनाचे अधिकारी आणि विद्यार्थी संघटनेच्या प्रतिनिधी यांच्यात झालेल्या बैठकीत ओबीसींना देण्यात येणारी परदेशी शिष्यवृत्ती संख्या १० च्या ऐवजी ५० करणे याबाबत चर्चा होऊनही आजमितीस याबाबत कोणतेही आदेश निर्गमित झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे सदर प्रवर्गातील विद्यार्थ्यांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१७-०८-२०२२) :** (१) होय.
(२), (३) व (४) मा.श्री.छगन भुजबळ, मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीने केलेल्या शिफारशीनुसार विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील गुणवंत १० विद्यार्थ्यां ऐवजी ५० गुणवंत विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणासाठी प्रतिवर्षी परदेशी शिष्यवृत्तीचा लाभ देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून नियोजन व वित्त भागाच्या अभिप्रायानुसार प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या निर्णयार्थ ठेवण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोमनाथनगर (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रकमेत झालेल्या अपहाराबाबत

**(६) १३७८४ (०४-०७-२०२२) श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाकडून आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरीता इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी एक हजार रूपये, पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना पंधराशे रुपये तसेच आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना दोन हजार रूपये एवढी शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थी व पालकांच्या बँक खात्यात जमा केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोमनाथनगर जिल्हा परिषदेच्या शाळेतील (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) मुख्याध्यापक व शिक्षकांनी सन २०१७-२०१८ ते सन २०२०-२०२१ या पाच वर्षाच्या कालावधीत विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थी व पालकांच्या बँक खात्यात जमा न करता त्रयस्थ व्यक्तिंच्या नावे जमा करून सदर रक्कमेचा अपहार केल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२२-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय.

प्रस्तुत प्रकरणी संबंधित शिक्षण विस्तार अधिकारी यांचे मार्फत चौकशी करुन सोमनाथ नगर शाळेचे मुख्याध्यापक तसेच शाळेचे सहशिक्षक यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांचे दिनांक ०६/०६/२०२२ रोजीच्या आदेशान्वये जिल्हा परिषदेच्या सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे.

तसेच संबंधितांवर हरसूल पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण येथे भा.द.वि. कलम ४०६, ४०९, ४२० व ३४ अन्वये गुन्हा क्र.८७/२२, दिनांक ०९/०७/२०२२ रोजी दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दी बुलढाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँक मर्यादित, बुलढाणा बँकेतील अनुसूचित जमातीतील १३ कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्याबाबत

**(७) १३७८९ (०४-०७-२०२२) श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दी बुलढाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँक मर्यादित, बुलढाणा येथील अनुसूचित जमातीतील १३ कर्मचाऱ्यांना बँकेच्या सेवेतून कमी केले असून सदर कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्याबाबतचे पत्र स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सहकार मंत्री यांना दिनांक १२ मे, २०२२ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अनुसूचित जमातीतील कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्याबाबतच्या पत्रावर शासनाकडून अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद ४.२ अन्वये अधिसंख्य पदावर अनुसुचित जमातीतील १३ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून त्यांना न्याय देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१६-०८-२०२२) :** (१) होय.
(२) नाही.
(३) सहकार विभागाच्या दिनांक २५/०५/२०२२ च्या शासन निर्णयान्वये बँकेच्या सदर कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## समाज कल्याण विभागांतर्गत सुरू असलेल्या अनुदानित वस्तीगृहासाठी स्वतंत्र शासकीय इमारती बांधण्याबाबत

**(८) १४०८१ (०७-०७-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील समाज कल्याण विभागांतर्गत सुरू असलेल्या अनुदानित वस्तीगृहात आर्थीकदृष्टया दुर्बल घटकातील मुला-मुलींना शिक्षण घेता यावे या हेतुने तालुका व जिल्हा स्तरावर ४४१ शासनअनुदानित वसतिगृहे कार्यरत असून त्यापैकी केवळ ३३ वसतिगृहे शासकीय इमारती असल्याचे दिनांक १८ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील उर्वरीत वसतिगृहांच्या स्वतंत्र इमारती बांधण्याचे शासनास प्रस्तावित आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.

सामाजिक न्याय विभागांतर्गत राज्यात एकूण ४४१ शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. त्यापैकी एकूण २६४ वसतिगृहे शासकीय इमारतीमध्ये कार्यरत आहेत.
(२) होय.

(३) नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बदलापूर (जि.ठाणे) येथील एमआयडीसीच्या मुख्य जलवाहिनीवर पाणी माफियांनी अतिक्रमण केल्याबाबत

**(९) १४१२६ (०४-०७-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बदलापूर (जि.ठाणे) रस्त्यालगत असलेल्या एमआयडीसीच्या मुख्य जलवाहिनीवर पाणी माफियांनी अतिक्रमण केले असून प्रतिदिन दीड लाख लीटर पिण्याच्या पाण्याची चोरी करुन सदर पाणी गाड्या धुण्यासाठी उभारण्यात आलेल्या सर्व्हीस सेंटरमध्ये वापरले जात असतानाही एमआयडीसी कडून सदरहू पाणी माफियांविरोधात आजमितीस कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बदलापूर पाईपलाईन रोडवर असलेले अनेक हॉटेल, ढाबे, एमआयडीसीच्या सदर जलवाहिनीमधील पाणी चोरुन वापरत आहेत, या मार्गावरील जलवाहिन्यांना छिद्रे पाडून पाणी चोरी करण्याचे प्रकार होत आहेत तसेच अंबरनाथ पासून ते शिळफाटा असे सुमारे १० किमीच्या परिसरात अनेक सर्व्हिस सेंटर उभारुन स्वस्तात वाहने धुण्यासाठी येत असतात, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर पिण्याच्या पाण्याची चोरी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एमआयडीसीच्या या जलवाहिन्यांतून कल्याण-डोंबिवली, ठाणे, नवी मुंबई, मीरा-भाईंदर आदी पालिकांना पाणीपुरवठा केला जात असून डोंबिवलीतील संदप गावात पाण्यासाठी एकाच कुटुंबातील ५ जणांचा नाहक बळी गेला असताना होणाऱ्या सदर पाणीमाफीयांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२२-०८-२०२२) :** (१) म.औ.वि. महामंडळाच्या जलवाहिन्यांना छिद्रे पाडून पाणी चोरी करण्याचे प्रकार होत आहेत, हे खरे आहे. बदलापूर ते काटई रस्त्यावरील बारवी गुरुत्व वाहिनी (साखळी क्र. ०.०० मी. ते १०००० मी.) म.औ.वि.महामंडळाच्या डोंबिवली व अंबरनाथ विभागाच्या अखत्यारितील जलवाहिन्यांवर होत असलेल्या अनधिकृत नळजोडण्या न होण्यासाठी संपूर्ण जलवाहीन्यांच्या भागावर देखरेख ठेवण्यासाठी सिक्युरिटी एजन्सी म्हणून महाराष्ट्र राज्य सुरक्षा बल यांची निवड करण्यात आली आहे. त्यानुसार म.औ.वि.महामंडळातर्फे १७७२ मि.मी व्यासाच्या दोन तर १६०० मि.मी व्यासाच्या जलवाहीन्यांच्या संरक्षणासाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा बलाचे सुरक्षा रक्षक नेमण्यात आलेले आहेत. तसेच म.औ.वि. महामंडळाचे कर्मचारी देखील सदर जलवाहिनीवर पाणी चोरी होऊ नये म्हणून गस्त घालत असतात.

म.औ.वि. महामंडळाने १७७२ मि.मी व्यासाच्या दोन व १६०० मि.मी व्यासाची १ अश्या अंबरनाथ ते काटई रस्त्यावरील पाईपलाईनवर होत असलेल्या ५७४ अनधिकृत नळजोडण्या मागील वर्षात अंबरनाथ विभागामार्फत व डोंबिवली विभागामार्फत मागील वर्षात ८१७ इतक्या अनधिकृत नळजोडण्या निष्कासित केल्या आहेत.

म.औ.वि. महामंडळाच्या डोंबिवली विभागामार्फत संबंधित अनधिकृत नळजोडण्या करणाऱ्या व्यक्तींवर दिनांक १३/०५/२०१६, ९/११/२०१८, २०/०६/२०२०, १८/०३/२०२१ व दिनांक ०२/०८/२०२१ रोजी फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. मानपाडा पोलीस स्टेशन, डोंबिवली यांचेतर्फे संबंधित व्यक्तिंची चौकशी चालू आहे. अनधिकृत नळजोडण्या पुन्हा आढळून आल्यास त्या ताबडतोब तोडून त्यावर वेल्डींग करण्याचे काम प्राधान्याने करण्यात येऊन पाणीगळती बंद करण्यात येते.

(२) बदलापूर (जि.ठाणे) रस्त्यालगत असलेल्या एमआयडीसीच्या मुख्य जलवाहिनीवर पाणी माफियांनी अतिक्रमण केले आहे, हे खरे नाही. परंतु एमआयडीसीच्या जलवाहिन्यांना छिद्रे पाडून पिण्याच्या पाण्याची चोरी होत आहे, हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत समाविष्ट असलेल्या २७ गावांना पाणीपुरवठा करण्याकरीता कल्याण डोंबिवली महानगरपालिका पाण्याचा "उध्दव" म्हणून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसीच्या) जलवाहिन्यांचा वापर करते. म.औ.वि.महामंडळाच्या मुख्य जलवाहिनीवरील नळजोडणी नंतरची अंतर्गत पाणी पुरवठ्याच्या वितरण व्यवस्थेची जबाबदारी ही पूर्णत: कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची आहे.

दिनांक ०६/०५/२०२२ रोजी डोंबिवली मधील देसलेपाडा येथील गायकवाड कुटूंबातील दोन महिला व तीन मुले असे एकूण पाच सदस्य खदाणीमध्ये कपडे धुण्यासाठी गेले असता खदाणीमधील पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची नोंद मानपाडा पोलीस स्टेशन, डोंबिवली (पू) येथील नोंदवहीत घेण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील आधारभूत खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत

**(१०) १४२७७ (२३-०६-२०२२) डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात आधारभूत किमतीत शेतमाल खरेदीच्या शासकीय हमीभाव योजनेंतर्गत खरेदी केंद्र उघडण्यात आले असून नाफेडची ११ खरेदी केंद्र बारदाना उपलब्ध नसल्याने बंद पडल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे हजारो शेतकऱ्यांचे नुकसान झाले असल्याने त्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू बंद खरेदी केंद्र तातडीने सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०८-२०२२) :** (१) बुलढाणा जिल्ह्यात हमीभावाने हरभरा(चना) खरेदीसाठी खालीलप्रमाणे खरेदी केंद्रे सुरू करण्यात आली होती :-

| | |
|---|---|
| पणन महासंघ, मुंबई | -११ |
| विदर्भ पणन महासंघ, नागपूर | -०६ |
| महाएफपीसी, पुणे | -३८ |
| पृथाशक्ती, अहमदनगर | -१४ |
| वॅपको, नागपूर | -०९ |
| एकूण | -७८ |

नाफेड कार्यालय,कोलकत्ता यांच्याकडून होणारा बारदाना पुरवठा कमी प्रमाणात होत असल्याने, पणन महासंघाच्या ११ खरेदी केंद्रावरील हरभरा(चना) खरेदी संथ गतीने सुरू होते. विदर्भ पणन महासंघाचे जळगांव जामोद येथील खरेदी केंद्र दिनांक २८/०४/२०२२ ते ३०/०४/२०२२ या कालावधीत बंद होती बारदाना उपलब्ध होताच दिनांक ०१/०५/२०२२ पासून चना खरेदी पूर्ववत सुरू करण्यात आली आहे.
अन्य खरेदी केंद्रावर नियमितपणे हरभरा(चना) खरेदी सुरू होती.
(२) नाही.
(३) बुलढाणा जिल्ह्यातील खरेदी केंद्रावर हरभरा(चना) खरेदी सुरू असल्याने चौकशी करण्याची आवश्यकता नाही.

बुलढाणा जिल्ह्यात ७८ खरेदी केंद्रावर एकूण ७७९३२ शेतकऱ्यांनी नोंदणी केलेली होती. सदर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांपैकी ६६७३८ शेतकऱ्यांकडून १२०५२८४.८२ क्विंटल हरभरा(चना) खरेदी केलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासींच्या वनपट्यांचे प्रलंबित असलेले दावे निकाली काढण्याबाबत

**(११) १४३११ (०४-०७-२०२२) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १२४३४ ला दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वर्षानुवर्षे कसत असलेल्या जमिनींचे अधिग्रहण करण्यासाठी आदिवासी व सबंधित घटकांना जमीन वाटपासंदर्भात वनहक्क समितीकडे माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान एकूण २२ हजार ५४९ दावे दाखल झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात दाखल एकूण दाव्यांपैकी सुनावणी होऊन १७ हजार २७० दावे निकाली काढण्यात आले असून अद्यापही ५ हजार २७९ दावे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील विविध तालुक्यातील काही दावे जीपीएस मोजणीकरीता वनक्षेत्रपाल यांच्याकडे प्रलंबित आहेत तसेच काही दावे जिल्हास्तरीय समितीच्या निर्णयाकरीता प्रलंबित असून त्याबाबत जिल्हास्तरीय समितीकडून घेण्यात येणाऱ्या निर्णयासाठी किती कालावधी अपेक्षित आहे, तसेच सदर प्रकरणी दिनांक ५ एप्रिल, २०२२ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, प्रलंबित असलेले वनहक्क दावे प्राप्त झाल्यानंतर निकालासंबंधी कालमर्यादा ठरविण्याबात शासनाने निकष निश्चित करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, आदिवासींच्या वनपट्याचे प्रलंबित ५ हजार २७९ दावे निकाली काढून आदिवासींच्या अन्नसुरक्षा व उपजीविकेचा प्रश्न सोडविण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२२-०८-२०२२) :** (१) व (२) होय.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६ आणि नियम, २००८ व सुधारित नियम, २०१२ अंतर्गत राज्यामध्ये माहे जून २०२२ अखेरपर्यंत जिल्हास्तरीय वनहक्क समितीकडे प्राप्त झालेल्या एकूण २,८३,८०३ वैयक्तिक दाव्यांपैकी एकूण १,९४,७३८ दावे मान्य करण्यात आले असून एकूण ६९,५३१ दावे अमान्य करण्यात आले आहेत. तसेच राज्यामध्ये एकूण २६,३८१ वैयक्तिक दावे प्रलंबित असून ग्रामसभा स्तरावर एकूण ४,७६७ दावे प्रलंबित आहेत.

(३) विधानपरिषद तारांकित प्रश्न क्रमांक १२४३४ मध्ये नमुद केलेल्या प्रलंबित वनहक्क दाव्यांवर निर्णय घेणेकामी जिल्हा स्तरीय वनहक्क समिती, ठाणे यांचेकडे दिनांक ०५/०४/२०२२ आणि दिनांक १७/०६/२०२२ रोजी बैठक आयोजित करणेत आली होती. सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत.

१) कमी क्षेत्राबाबत दाखल झालेल्या २०९ अपील दाव्यांपैकी ४९ दाव्यात क्षेत्रवाढ करणेत आली असून, १२५ अपील दाव्यांत क्षेत्रवाढ अमान्य करणेत आली आहे. तसेच ३५ अपील दावे उपविभागीय स्तरीय समितीकडे फेरचौकशी कामी पाठविणेत आले आहेत.

१.१)उपविभागीय स्तरीय समितीच्या निर्णयाविरुध्द दाखल झालेल्या ६० अपील दाव्यांपैकी २५ अपील दावे मान्य करणेत आले असून, ३५ अपील दावे अमान्य करण्यात आले आहे.

१.२)उपविभागीय स्तरीय समितीकडून प्राप्त झालेल्या २९ नियमीत दाव्यांपैकी १५ दावे मान्य करणेत आले असून, १४ दावे अमान्य करणेत आले आहेत.

१.३) वाटप वनपट्टामध्ये झालेली चुक दुरुस्ती करणेकामी प्राप्त २३ दाव्यांत चुक दुरुस्ती करणेत आली आहे.

२) एकूण ९७ दावे जीपीएस मोजणीकरीता वनक्षेत्रपाल यांच्याकडे पाठविणेत आले होते. त्यापैकी ८७ दाव्यांत जी.पी.एस मोजणी पूर्ण झाली असून, त्याबाबतचा अहवाल जिल्हा स्तरीय समितीकडे प्राप्त झाला आहे, त्यापैकी २९ दाव्यांत निर्णय घेण्यात आला असून, उर्वरीत ५८ अपील दाव्यांवर निर्णय घेण्यात येणार आहे. ९ दावे मोजणीसाठी प्रलंबित आहेत.

(४) व (५) वनहक्क दावे प्राप्त झाल्यानंतर निकाली काढण्याची निश्चित कालमर्यादा कायद्यामध्ये दिलेली नाही. तथापि, वनहक्क कायद्याची अंमलबजावणी व सनियंत्रण यासाठी मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सनियंत्रण समितीच्या बैठकांमध्ये सर्व जिल्हाधिकारी यांना वनहक्काची प्रकरणे विहित कालावधीत निकाली काढण्याचे निदेश दिले जातात. तसेच सचिव, आदिवासी विकास यांच्या अर्धशासकीय पत्रान्वये वेळोवेळी जिल्हाधिकारी यांना वनहक्काची प्रकरणे निकाली काढण्याच्या सूचना दिल्या जातात.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शेतकऱ्यांना सुलभ कर्जपुरवठा करण्यासाठी सुधारीत के.सी.सी. योजनेच्या अंलबजावणी प्रक्रियेत बदल करण्याबाबत

**(१२) १४४१३ (२३-०६-२०२२) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांकरीता राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेने सुरु केलेल्या सुधारीत के.सी.सी. योजनेतून कॅश क्रेडिटची सुविधा देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्जाची उचल व भरणा करणेसाठी विवक्षित तारखांचा दंडक घातल्याने या योजनेचे लाभ मिळणेऐवजी शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याने यात बदल करावा, तसेच शेतकऱ्यांना देण्यात येणारी व्याज सवलत, मिळणारे अनुदान, पीक विमा योजना, दुष्काळी स्थितीत कर्ज रुपांतरणाची सवलत इ. बाबींच्या सदोष अंमलबजावणीमुळे शेतकरी अडचणींमध्ये येत असल्याने यामध्ये बदल करुन मिळणाऱ्या सर्व प्रकारच्या लाभाच्या रक्कमा के.सी.सी खात्यातच जमा कराव्यात अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तसेच शेतकऱ्यांना देण्यात येणारी कर्जमाफी, व्याज माफी हे शब्द प्रयोग योग्य वाटत नसल्याने, त्याऐवजी कोणत्याही सवलतीत अनुदान संबोधण्यात यावे, अशी ही मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करणाऱ्या के.सी.सी. योजनेच्या अंमलबजावणी प्रक्रियेत तसेच अनार्थिक अनुकुल बाबींमधील दोष निवारण्याकरीता धोरणात्मक बदलांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१६-०८-२०२२) :** (१) होय.

(२) नाही.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शहरातील दिक्षाभूमीची विकास कामे करण्याबाबत

**(१३) १४५९१ (०१-०७-२०२२) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील दिक्षाभूमीच्या विकास कामासाठी राज्य शासनाने रुपये १०० कोटी रुपये मंजूर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दिक्षाभूमीच्या विकास कामाचे रुपये १०० कोटी नागपूर सुधार प्रन्यास कडे प्रलंबित असून दिक्षाभूमी विकासाकरीता निधी मंजूर असूनही विकासकामे झाले नसल्याचे दिनांक १६ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विकास कामांचा मंजूर निधीचा वापर करुन दिक्षाभूमीची विकास कामे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे
(२), (३) दिक्षाभूमी येथील प्रकल्पास रुपये ४०.०० कोटी इतका निधी वर्ग करण्यात आलेला आहे. उच्चस्तरीय सचिव समितीच्या बैठकीतील निर्देशानुसार प्रकल्पाच्या आराखड्यात व अंदाजपत्रकात काही बदल/सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत. त्यानुषंगाने सुधारीत प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला असून उपरोक्त प्रस्तावास शासन मान्यता देणेबाबतची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उद्योग संचालयनामध्ये विशेष कार्य अधिकारी (वर्ग-१) यांच्या बदलीबाबत

**(१४) १४६४५ (०७-०७-२०२२) श्री.अनिकेत तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उद्योग विभागाच्या उद्योग संचालयनामध्ये श्रीमती विजुताई शिरसाट ह्या मागील ९ वर्षापासून विशेष कार्यकारी अधिकारी (वर्ग-१) या पदावर कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दरम्यानच्या काळात श्रीमती शिरसाट यांची अधीक्षक उद्योग अधिकारी या तांत्रिक पदावर पदोन्नती होऊनसुध्दा त्या पदोन्नतीच्या पदावर रुजू न होता त्यांच्या आस्थापना प्रशासकीय पदावरच कार्यरत असल्याचे दिनांक ३० मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २५ मे, २००६ रोजीच्या शासन निर्णयानुसार बदलीन्वये नेमून दिलेल्या ठिकाणी कर्तव्य पार पाडण्यास कसूर केल्यास अशा कसुरदारांविरुध्द कारवाई करण्याची नियमाधिन तरतूद असतानाही तसेच श्रीमती शिरसाट यांच्याविरुध्द मा.लोकप्रतिनिधींनी व त्रस्त नागरिकांनी शासनाकडे तक्रारी करुनही त्यासंदर्भात श्रीमती शिरसाट यांच्याविरुध्द अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने श्रीमती शिरसाट यांच्याविरुध्द शिस्तभंगाची व नियमभंगाची कारवाई करण्याबाबत तसेच बदलीच्या ठिकाणी रुजू होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (१८-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) श्रीमती शिरसाठ ह्या नेमून दिलेल्या ठिकाणी रुजू झाल्या आहेत. त्यांचेविरुध्दच्या तक्रारीच्या अनुषंगाने प्राप्त अहवालानुसार सदर तक्रारीमध्ये तथ्य नसल्याचे दिसून येते. त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळाला निधी वितरित करण्याबाबत

**(१५) १४६७६ (०४-०७-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षामध्ये शामराव पेजे कोकण व इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळाकरीता रुपये १०००/- (रुपये एक हजार) अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात पावसाळी अधिवेशन, २०२१ मध्ये पुरवणी मागणीद्वारे रुपये ५०.००कोटी इतक्या रक्कमेची तरतुद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सन २०२१-२०२२ मध्ये पुरवणी मागणीव्दारे मंजूर करण्यात आलेला रुपये ५०.०० कोटी इतका निधी महामंडळास तात्काळ वितरित करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१७-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळास सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षात पावसाळी अधिवेशन २०२१ मध्ये बाब क्र.१६८ अन्वये रुपये ५०.०० कोटी इतकी रक्कम पुरवणी मागणीद्वारे तरतूद करण्यात आली आहे.

(३) विभागाच्या दिनांक ३१/०३/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये ५०.०० कोटी इतका निधी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळास तात्पुरत्या स्वरुपात वितरीत करण्यात आला आहे. तसेच दिनांक ०६/०५/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रुपये १५.०० कोटी वरुन रुपये १००.०० कोटी इतके करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरोळे (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाल्याबाबत

**(१६) १४७१० (०४-०७-२०२२) श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोळे (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील आश्रमशाळेतील १७ विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाल्याची घटना घडल्याचे दिनांक २८ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न विषबाधेमुळे नऊ वर्षाच्या एका विद्यार्थीनीचा दिनांक २९ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा दुर्घटना भविष्यात घडू नयेत याकरीता सदर आश्रमशाळा परिसरात शासनामार्फत कोणकोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत, मृत विद्यार्थीनीच्या शवविच्छेदन अहवालात (पोस्टर्माटम रिपोर्टमध्ये) काय नमूद करण्यात आले आहे तसेच वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे पाठविण्यांत आलेला व्हिसेरा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय व सदर अहवालात काय नमूद करण्यात आले आहे व त्यानुसार त्याबाबत पुढे कोणती कार्यवाही करण्यात आलीआहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चोकशी केली आहे काय, चोकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर प्रकरणी दोषी असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करुन मृत विद्यार्थीनीच्या कुटुंबियांना व बाधित विद्यार्थ्यांना शासनाने आर्थिक मदत करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२६-०८-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.

मात्र भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुदानित आश्रमशाळा शिरोळे, ता.भिवंडी, जि.ठाणे या आश्रमशाळेतील विद्यार्थीनी कु. ज्योत्स्ना जयवंत सांबर हिचा दिनांक २९/०३/२०२२ रोजी मृत्यू झाला आहे. व्हिसेरा अहवालामध्ये, हा मृत्यू विषबाधेमुळे झाला नसल्याचे नमूद आहे.
(३) अपर आयुक्त आदिवासी विकास, ठाणे यांनी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या अनुषंगाने प्रकल्प अधिकाऱ्यांना दिनांक ०६/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत. याव्यतिरिक्त आश्रमशाळेतील मुलांच्या आरोग्यासंदर्भात शासनस्तरावरुन तसेच आयुक्तालयाच्या स्तरावरून वेळोवेळी सूचना दिल्या जातात.

वैद्यकिय अधिकारी इंदिरा गांधी स्मृती रुग्णालय, भिवंडी यांच्या अहवालानुसार सदरचा मृत्यू हा “Cardio respiratory failure due to Hypovolemic Shocks and Dehydration ” यामुळे झाला असल्याचे नमुद आहे.
(४) उप आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांच्या अध्यक्षतेखालील ५ सदस्यीय समितीने सदर प्रकरणी चौकशी केली आहे. सदर प्रकरणी शाळेतील प्रभारी अधिक्षिका व प्राथमिक मुख्याध्यापक यांना दिनांक ०९/०४/२०२२ पासून निलंबित करण्यात आले आहे. मृत विद्यार्थीनीच्या कुटुंबियांना आर्थिक मदत म्हणून सानुग्रह अनुदान शासनाकडुन रुपये १ लाख व संबंधित संस्थेकडुन रुपये १ लाख असे एकूण रुपये २ लाख देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खैरीपरसोडा (ता.रामटेक, जि.नागपूर) येथील एकलव्य मॉडेल निवासी शाळा नवीन इमारतीत स्थलांतरीत करण्याबाबत

**(१७) १४८६६ (०४-०७-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणापासून चांगले मार्गदर्शन मिळण्याकरीता जिल्हास्तरावर एकलव्य मॉडेल निवासी शाळा १२ वी पर्यंत सुरू करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शाळेकरीता नवीन इमारतीचे बांधकाम करून सर्व सुविधायुक्त शाळेचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून खैरीपरसोडा (ता.रामटेक, जि.नागपूर) येथील एकलव्य मॉडेल निवासी शाळा अद्यापही नवीन इमारतीत स्थलांतरीत केलेली नसल्याने करोडो रक्कम खर्च करुन बांधण्यात आलेली शाळेची इमारत विना वापर पडून आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इमारत बांधकाम करतेवेळी शाळेत येण्याजाण्याकरीता रस्ता बांधकाम न केल्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांना रेल्वेरुळांवरुन रहदारी करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने तातडीने रस्ता बांधकाम करून नवीन शैक्षणिक सत्र २०२२-२०२३ या वर्षी शाळा हस्तांतरीत करून सुसज्ज इमारतीत शाळा सुरू करून गरीब आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधेसह योग्य मार्गदर्शन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२४-०८-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे. खैरीपरसोडा ता.रामटेक जि.नागपूर येथील एकलव्य निवासी शाळेचे बांधकाम पूर्ण झाले आहे. सदर नवीन बांधण्यात आलेल्या एकलव्य निवासी संकुलाला लागणारा जोड रस्त्याची जागा ही औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या अंतर्गत असलेल्या शासकीय जमिनीतून प्रस्तावित केलेली आहे. सदर रस्त्यासाठी जागा देण्यास कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, यांचेकडून दिनांक २९/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानूसार रस्ता बांधकामाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर शाळा नविन इमारतीत स्थलांतरीत करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शहरालगत असलेल्या बेसा - बेलतरोडी मधील महाकालीनगर झोपडपट्टीतील लागलेल्या आगीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळणेबाबत

**(१८) १४८६९ (०४-०७-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरालगत असलेल्या पेरी अर्बन क्षेत्र बेसा - बेलतरोडी येथे महाकालीनगर झोपडपट्टी वसलेली असून या झोपडपट्टीत गॅस सिलेंडर स्फोटामुळे दिनांक ९ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास आगीची घटना घडलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर झोपडपट्टीत जवळपास १०० गरीब कुटुंब, हातमजुर व कामगार राहत असल्याने लागलेल्या आगीत त्यांचे आवश्यक असलेले सर्व साहित्य जळून नष्ट झाल्यामुळे आर्थिक नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नैसर्गिक आपत्ती पंचनामा करून पूर्णतः नुकसान झालेले ७७ कुटुंबिय, लाभार्थी झोपडपट्टीधारक तथा अशंतः नुकसान झालेले १५ लाभार्थी असून अद्यापही शासनातर्फे त्यांना कुठलेही खावटी अनुदान व आवश्यक इतर साहित्य उपलब्ध तथा झालेली नुकसानभरपाई दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने हातमजुर व कामगार यांना तातडीने आर्थिक अनुदान व आवश्यक मूलभूत सुविधा व साहित्य उपलब्ध करुन देणेबाबत तसेच झालेली नुकसानभरपाई देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१८-०८-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) अंशत: खरे आहे.
सदर आपत्तीमध्ये पूर्णतः नुकसान झालेल्या ८७ व अशंतः नुकसान झालेल्या १६ झोपडपट्टीधारकांना या विभागाच्या दिनांक १३/०५/२०२१५ च्या शासन निर्णयातील निकषानुसार दिनांक २१/०६/२०२२ रोजी रुपये ७,१८,६५०/- इतके सानुग्रह अनुदान अदा करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्ह्यात सौरउर्जेवरील सौर कृषी पंप वाटपात झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१९) १४८७९ (२७-०६-२०२२) श्री.रामराव पाटील, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सुरेश धस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यात सन २०२१ मध्ये अनुसूचित जाती व जमाती घटकातील शेतकऱ्यांसाठी राबविण्यात आलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेत शेतीपंपाच्या वाटपात कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार झाला असून सदर योजनेसाठी लागणारा निधी सामाजिक न्याय व आदिवासी विभागातून घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेवगाव व पाथर्डी (ता.जि.अहमदनगर) येथील सर्वसाधारण गटातील लोकांनी अनुसूचित बनावट प्रमाणपत्र जोडून सदर योजनेचा लाभ घेतला असल्याचे तसेच भुमिहीन मृत व्यक्तींच्या नावे कृषी पंप वितरित केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सौरपंप उभारणीच्या चौकशीकरीता गठीत करण्यात आलेल्या समितीने लाभार्थ्यांची निवड करताना मूळ कागदपत्रांची तपासणी केली आहे काय तसेच सात लाभार्थ्यांनी एकापेक्षा जास्त वेळा अर्ज करुन मंजूर सौरकृषी पंप परस्पर स्थलांतरीत केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सौर उर्जेवरील शेतीपंपाच्या वाटपातील गैरव्यवहार प्रकरणी सहायक अभियंता, पाथर्डी ग्रामीण यांनी पोलीस उपअधीक्षक, शेवगाव, उप विभाग यांच्याकडे गुन्हा नोंदविण्यासाठी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने तसेच एका सौरपंपाच्या अंमलबजावणीतील अनियमिततेप्रकरणी कनिष्ठ अभियंता, मिरी कक्ष, पाथर्डी उपविभाग यांना बजावण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-०८-२०२२) :** (१) सदर योजनेसाठी सन २०२१ मध्ये सामाजिक न्याय व आदिवासी विभागाकडून निधी प्राप्त झाला आहे, हे खरे आहे. सन २०२१ मध्ये अनुसूचित जाती व जमाती घटकातील शेतकऱ्यांसाठी राबविण्यात आलेल्या सदर योजनेत गैरव्यवहार झाला असल्याची तक्रार प्राप्त झाली आहे.
(२) याबाबतच्या प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, अहमदनगर यांना संबंधित लाभार्थींचा जातीचा प्रवर्ग/ जात प्रमाणपत्र तपासणी करुन तसेच तहसिलदार, शेवगाव यांना ७/१२ तपासणी करुन अहवाल सादर करण्यास कळविण्यात आले आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) होय हे खरे आहे.
(४) अधीक्षक अभियंता, महावितरण, अहमदनगर यांनी पाथर्डी उपविभागांतर्गत सौरपंप उभारणीच्या चौकशीकरीता दिनांक ०६/१२/२०२१ रोजी समिती गठीत केली. सदर समितीने चौकशीअंती सात लाभार्थ्यांनी एकापेक्षा जास्त वेळा अर्ज करुन तसेच मंजूर सौरकृषी पंप परस्पर स्थलांतरीत करुन शासनाची फसवणूक केल्याचे आढळल्याने सातपैकी पाच लाभार्थ्यांवर तपासाअंती फिर्याद (FIR १३२/२९/०२/२०२२) दाखल करण्यात आली आहे. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक, पाथर्डी पोलीस स्टेशन यांचेकडून चौकशीची कार्यवाही चालू आहे.

तसेच एका सौरपंप लाभार्थ्याच्या प्रकरणी कनिष्ठ अभियंता, मिरीकक्ष, पाथर्डी उपविभाग यांना एक वार्षिक वेतनवाढ संचयी परिणामाची तरतूद लागू न करता रोखून धरणे ही शिक्षा बजावण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरगांव (ता.भिवडी, जि.ठाणे) येथील वीटभट्टी मजूरांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(२०) १४८९७ (२७-०६-२०२२) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरगांव (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे वीटभट्टी मजूरांच्या १७ झोपड्या जळून नष्ट झाल्याचे दिनांक १६ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मजुरांनी सदर झोपडीत साठवलेले धान्य, कपडे, पांघरुण यांचे जळून नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शासनाने या मजूरांच्या नुकसानीचे पंचनामे करुन त्यांना आर्थिक मदत देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०८-२०२२) :** (१) खरे आहे.
(२) खरे आहे.

(३) सदर घटनेमुळे बाधित झालेल्या १८ कुटुंबांना स्वयंसेवा संस्थेमार्फत प्रत्येक कुटुंबनिहाय २५ किलो गहू, २५ किलो तांदूळ व ब्लँकेट, चादर इत्यादीचे वाटप करण्यात आले आहे. तसेच बाधित कुटुंबाना मदत देण्याबाबतचा प्रस्ताव शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक १३/०५/२०१५ मधील निकष विचारात घेऊन प्रस्ताव सादर करण्याबाबत तहसिलदार, भिवंडी यांना जिल्हाधिकारी, ठाणे यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.